सकाळ
• सातारा, बुधवार, १२ फेब्रुवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# माती, लोकांचे संस्कारच घडवतात कलावंत

## अष्टपुत्रे-हरदास ; कोरेगावात डी. पी. भोसले महाविद्यालयात पारंपरिक दिवस

**कोरेगाव, ता. ११ :** माझ्यातील कलावंताची जडणघडण रयत शिक्षण संस्थेनेच केली आहे. मात्र, आमच्या वेळेचे महाविद्यालय आता बदलले असून, डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये आता पुणे- मुंबईसारख्या सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना पुरवल्या जात आहेत, असे प्रशंसोद्‍गार अभिनेत्री व लेखिका प्राची अष्टपुत्रे-हरदास यांनी काढले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये पारंपरिक दिवस व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करणाऱ्या 'विविध गुणदर्शन' कार्यक्रमाच्या उद्‍घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते. या वेळी आझाद महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. एस. एम. शिकलगार, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या डॉ. मनीषा पाटील, उपप्राचार्य व कार्याध्यक्ष डॉ. एस. डी. जाधव, डॉ. विजय वाढते, प्रा. सी. बी. जावळे उपस्थित होते. गावाची माती, भाषा आणि लोक यांचे संस्कारच कलावंताला घडवतात. त्यानुसार मी देखील या महाविद्यालयात अशीच घडली आहे, असेही प्राची अष्टपुत्रे यांनी सांगितले.



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेला लक्षवेधी कलाप्रकार.**

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा सादर केल्या. विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. परीक्षक म्हणून सोनल भंडारे, मयूर कुचेकर, अर्जुन यादव, प्रा. रामदास निकम, महेश शिंदे, कविता देवकर, प्राजक्ता कुलकर्णी यांनी काम पहिले. प्राचार्य डॉ. सावंत यांच्या मार्गदर्शखाली प्रा. सचिन निकम, प्रा. नलिनी ढाणे यांच्यासह समिती सदस्यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.